SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

Question Bank for Mar 2022 (Summer) Exaination

B.A. 2 SEM III PAPER NO. IV

विद्याशाखीय विशेष गाभा (DSC-C2) अभ्यासपत्रिका - ४

पाठ्यपुस्तक - काव्यगंध

SUBJECT CODE - 73347

**प्रश्न १. योग्य पर्याय निवडा . गुण 10**

१) कवी केशवसुत यांचे पूर्ण नाव काय ?

अ) प्रल्हाद केशव अत्रे ब) केशव सखाराम देशमुख क) कृष्णाजी केशव दामले ड) मोरेश्वर केशव दामले

२) अंत्यजाची मुले कोठे खेळत होती ?

अ) मैदानावर ब) बागेत क) शाळेसमोर ड) रस्त्याकडेला

३) आज भुकेमुळे कोण मरतो आहे ?

अ) अंत्यज ब) श्रीमंत क) मजूर ड) अंत्यजाचा मुलगा

४) पतीच्या नावाचा रेखीव कशिदा कोठे आहे ?

अ) काळया मखमलीवर ब) जाळीच्या पडद्यावर क) लाकडी फळांवर ड) घराच्या भिंतीवर

५) जगाची भाषा कळत असतानाही ती काय झाकायला शिकली होती असे बापट म्हणतात ?

अ) प्रेम ब) पदर क) शब्दांमधल्या छटा ड) अटळ निराशा

६) सन अठराशे मध्ये कुठे भेट घडायला हवी होती असे कवीला वाटते ?

अ) पुणे ब) मुंबई क) कोल्हापूर ड) नागपूर

७) जिंदगी कशात बरबाद झाली असे नारायण सुर्वे म्हणतात ?

अ) भाकरीचा चंद्र शोधण्यात ब) नोकरीत क) जागा शोधण्यात ड) गिरणीत

८) कष्टकरी आई कारखान्याची आरास बघायला मुलांना कधी घेऊन जायची ?

अ) गुढीपाडव्याला ब) पंचमीला क) दसऱ्याच्या आदल्या दिनी ड) होळीला

९) कामगार चळवळीत पडेल ते काम करणाऱ्या तरुणांचे भावविश्व कोणत्या कवितेत सुर्वे यांनी चित्रित केले आहे ?

अ) पोष्टर ब) दोन दिवस क) गिरणीची लावणी ड) नेहरू गेले त्या वेळची गोष्ट

१०) ओलेच खमीस खांद्यावर टाकून कोण घराकडे वळले ?

अ) कामगार ब) कवी क) पोष्टर चिकटवणारी मुले ड) हातगाडीवाला

११) कवीला त्या संध्याकाळी कवीला त्या संध्याकाळी समुद्र कसा वाटला ?

अ) रक्ताळलेल्या घोड्यासारखा ब) पुस्तकासारखा क) शांत ड) खवळलेला

१२) माणसं केव्हा देशोधडीला लागतात असे डहाके म्हणतात ?

अ) महापूर आला की ब) विकास आला की क) भूकंप झाला की ड) लढाई झाली की

१३) वास्तवाचा विस्तव कोणाच्या हातात द्यायचा आहे असे कवी सांगतो ?

अ) महापुरुषांच्या ब) पुतळयांच्या क) पुढच्या पिढीच्या ड) मागच्या पिढीच्या

१४) वस्त्या कशात बुडाल्या आहेत असे कवीला वाटते ?

अ) महापुरात ब) भूकंपात क) प्रश्नांकित काळोखात ड) धुक्यात

१५) दंगलीतली आडमुठी भाषा काय विसरते ?

अ) शस्त्रे ब) हिंसा क) समष्टी ड) माणुसकीचे व्याकरण

१६) प्रत्येकजण सुरक्षेसाठी काय शोधतो आहे ?

अ) पोलिसांकडे जातो ब) आपापल्या कळपाचा शोध घेतो क) तक्रार करतो ड) घराला कुंपण घालतो

१७) जन्मभर दावणीला कोण बांधलं गेलंय असं कवयित्रीला वाटते ?

अ) पाळीव प्राणी ब) बाय आणि गाय क) रक्तपिपासू गोचीड ड) पुरुष

१८) सैन्यात भरती झालेला भाऊ शहीद झाला तेव्हा कोणत्या घोषणा घुमल्या ?

अ) वंदे मातरम् ब) भारत माता की जय क) जय हिंद ड) जय जवान जय किसान

१९) लाख जग बदललं तरी कशाशी बांधलेलं आयुष्य तोडता येत नाही ?

अ) गायीशी ब) आईशी क) भूमीशी ड) वास्तवाशी

२०) कवितेचे प्रमुख लक्षण कोणते मानले आहे ?

अ) लय ब) चित्र क) प्रतिमा ड) प्रतीक

२१.आधुनिक काव्याचे जनक कोण?

अ) केशवकुमार ब) कुसुमाग्रज क) केशवसुत ड) बालकवी

२२. बाय आणि गाय ही कविता कोणाची?

अ)अजीम राही ब) नारायण सुर्वे क) कल्पना दुधाळ ड) वसंत आबाजी डहाके

२३. कोणती गोष्ट वाया जाऊ नये म्हणून सूर्यनारायणाकडे केली जाते?

अ) होस्टेलला भरलेले पैसे ब) ताटातील अन्न क) ढीगभर सूचना ड) आई-बापांच्या खस्ता

२४. लेकरासाठी कोण खस्ता खातात?

अ) आई-बाप ब) शिक्षक क) आजी-आजोबा ड) बहीण-भाऊ

२५. स्वातंत्र्य दिनाच्या दिवशी कोणती घोषणा दिली जात असे?

अ) वंदे मातरम्     ब) भारत माता की जय

क) स्वातंत्र्यदिन चिरायु होवो     ड) जय जवान जय किसान

२६. अजीम नवाज राही यांच्या कवितेत दाहक संदर्भ हा शब्दप्रयोग कोणत्या समस्येसंदर्भात आला आहे?

अ) स्त्रीसमस्या ब) अस्पृश्यता क) दुष्काळ ड) दंगल

२७. दंगलीतील आडमुठी भाषा काय विसरते

अ) शस्त्रे ब) हिंसा क) समष्टी ड) माणुसकीचे व्याकरण

२८. प्रश्नांकित काळोखात कोण बुडाले आहे असे कवीला वाटते

अ) लेखक ब) कवी क) वस्त्या ड) शहरे

२९. शिवरायाची गर्भश्रीमंती भकासपणे कोण न्याहाळतो आहे?

अ) कवी ब) मध्यमवर्गीय क) हाडकुळा देह ड) पाऊस

३०. उपाशी उंदराचा पेवात धुडगूस असा उल्लेख कोणत्या कवितेत आहे?

अ) दुष्काळ काही दाहक संदर्भ     ब) जातीय दंगल : १२ भानगडींची १३ वळणे

क) सुरक्षिततेची हमी देणारा कळपवाद ड) मोडतोडीतून डागडुगीची भाषा शिकताना

३१. उन्हा पावसात उभे राहण्याची कोणाला गरज नसते?

अ) शहराला ब) पुतळ्यांना क) समुद्राला ड) मंदिरांना

३२. हळूहळू कोणाच्या आयुष्याचा खेळ होतो असे कवी सांगतो?

अ) कवीच्या ब) मुलीच्या क) शहराच्या ड) वास्तवाच्या

३३. कवी केशवसुत कोणत्या कवितेतून जातीव्यवस्थेवर भाष्य करतात?

अ) तुतारी ब) नवा शिपाई क) अंत्यजाच्या मुलाचा पहिला प्रश्न ड) गोफण केली छान

३४. शांतीचे साम्राज्य कोण स्थापू इच्छितो?

अ) नवा शिपाई ब) अंत्यज क) ब्राह्मण ड) हिंदू

३५. फुंकर या कवितेतून कोणती प्रेमजाणीव व्यक्त झाली आहे?

अ) सफल ब) विफल क) हुरहुर ड) आनंदी

३६. फुंकर कवितेतील प्रियकराला काचेच्या कपाटात काय दिसते?

अ) फुलपाखरे ब) लाकडी फळे क) दोघांचे छायाचित्र ड) भुशांच्या राघूमैना

३७. जगाची भाषा कळत असतानाही ती काय झाकायला शिकली होती असे बापट म्हणतात?

अ)प्रेम ब) पदर क) शब्दांमधील छटा ड) अटळ निराशा

३८. जाळीच्या पडद्यावर काय कोरले आहे?

अ) पतीचे नाव ब) हृदय क) स्वतःचे नाव ड) प्रियकराचे नाव

३९. पुण्यात कधी भेट घडायला हवी होती असे कवीला वाटते?

अ) सन अठराशे ब) सन एकोणीसशे क) आजच्या काळात ड) भूतकाळात

४०. कौरवांच्या दरबारी लाज राखायला कोण धावून गेला?

अ) कृष्ण ब) कर्ण क) कबीर ड) कामगार

४१. कोण उजेड घेऊन चालला आहे असे कवी नारायण सुर्वे सांगतात?

अ) कामगार ब) कवी क) मुले ड) हातगाडीवाला

४२. आपल्यात कोणता अंश लाटेसारचा उसळतो असे कवयित्री म्हणते?

अ) पाण्याचा ब) धगीची ठिणगी क) प्रेमाचा बहर ड) स्त्रीचे दुःख

४३. अस्वस्थ वातावरणातूनच माझी कविता जन्मास येते, असे कवी कोणत्या कवितेत म्हणतो?

अ) दुष्काळ काही दाहक संदर्भ ब) जातीय दंगल : १२ भानगडींची १३ वळणे

क) सुरक्षिततेची हमी देणारा कळपवाद ड) मोडतोडीतून डागडुगीची भाषा शिकताना

४४. दोन भाषांचा प्रवास हा कौतुकास पात्र ठरत नाही, हे विधान कवीने कोणत्या दोन भाषांच्या संदर्भात केले आहे?

अ) हिंदी-इंग्रजी ब) उर्दू-मराठी क) इंग्रजी उर्दू ड) मराठी-हिंदी

४५. बाई गं तू काय मी काय, जन्मभर दावणीला बांधलेल्या हे वाक्य कोणी कोणास म्हटले आहे?

अ) आईने मुलीला ब) सासूने सुनेला क) गायीने बाईला ड) बाईने गायीला

४६. कवलाचं आभाळ गं लोखंडी कवाड हा कवितेतील उल्लेख कशाचा आहे?

अ) मंदिराच्या गाभाऱ्याचा ब) सासरच्या घराचा क) शाळेचा ड) दर्ग्याचा

४७. माझा कोट तुझ्या खांद्यावर, तुझी शाल अन् माझ्या देही, ह्या काव्यपंक्ती कोणत्या कवितेतील आहेत?

अ) अपरूप ब) फुंकर क) विस्मृती ड) स्मरते तुजला

४८. आज अचानक ही कविता कोणाची आहे?

अ) वसंत बापट ब) वसंत आबाजी डहाके क) कल्पना दुधाळ ड) अजीम नवाज राही

४९. गिरणीची लावणी ही कविता कोणाची?

अ) आण्णाभाऊ साठे ब) शाहीर अमर शेख क) नारायण सुर्वे ड) जगदीश खेबुडकर

५०. देख रे शिंदे उपर में चाँद का टुकडा या काव्यपंक्ती कोणत्या कवितेतील आहेत?

अ) चार दिवस ब) माझी आई क) गिरणीची लावणी ड) पोष्टर

५१. झुलत्या फांदीला गं ही कविता कोणाची आहे?

अ) कल्पना दुधाळ ब) आरती प्रभू क) ग्रेस ड) शांताबाई शेळके

**प्रश्न २. अंतर्गत विकल्पासह दीर्घोत्तरी प्रश्न. (दोन पैकी एक) गुण १०**

१. विश्वबंधुत्वाची भावना केशवसुत आपल्या कवितेतून कशा प्रकारे व्यक्त करतात?

२. 'तुतारी' या कवितेतून कवी बंडाचे निशाण का उभे करीत आहे?

३. कष्ट करण्याची तयारी असलेला मजूर दु:खी का झाला आहे?

४. 'गोफण केली छान' या कवितेतील विद्रोहाचे स्वरूप स्पष्ट करा.

५. 'अंत्यजाच्या मुलाचा पहिला प्रश्न' या कवितेतील सामाजिक जाणीव स्पष्ट करा.

**किंवा**

१. संसाराच्या बंधनात अडकलेल्या प्रेयसीचे वर्तन कसे आहे? ते 'फुंकर'च्या आधारे सांगा.

२. 'फुंकर' या कवितेमध्ये कोणकोणत्या भावांचे उत्कटपणे दर्शन घडविले आहे?

३. कवी वसंत बापट यांनी शरीराच्या सुंदरतेपेक्षा मनाच्या सुंदरतेला 'आज अचानक' कवितेत महत्त्व दिले आहे? कसे ते सविस्तर सांगा.

४. वसंत बापट यांच्या कवितेतील प्रियकराचे व्यक्तिमत्त्व कशाप्रकारचे आहे? ते सांगा.

५. वसंत बापट यांच्या 'विस्मृती' या कवितेतील काव्यसौंदर्य उकलून दाखवा.

**प्रश्न ३. अंतर्गत विकल्पासह दीर्घोत्तरी प्रश्न. (दोन पैकी एक) गुण १०**

१. नारायण सुर्वेंच्या ‘दोन दिवस’ या कवितेतून व्यक्त होणाऱ्या जाणिवा स्पष्ट करा.

२. नारायण सुर्वेंच्या कवितेतील अनुभवविश्वाचे चित्रण करा.

३. नारायण सुर्वे यांच्या कवितेतील प्रतिमांचे स्वरूप स्पष्ट करा.

४. नेहरू गेल्यानंतर निर्माण झालेल्या परिस्थितीचे चित्रण करा.

५. आईचा मृत्यू झाल्यामुळे मुलांमध्ये कशा प्रकारे भावनात्मक ताण निर्माण झाला?

किंवा

१. वसंत आबाजी डहाके यांच्या कवितेची वैशिष्ट्ये कोणती?

२. लघुनियतकालिकांमधून काव्यलेखन करणाऱ्या कवींची ओळख करून द्या.

३. महानगरीय कवितेची वैशिष्ट्ये थोडक्यात लिहा.

४. वसंत आबाजी डहाके यांच्या वास्तववाद या कवितेचे स्वरूप स्पष्ट करा.

५. वसंत आबाजी डहाके यांच्या कवितेतून येणाऱ्या प्रतिमांविषयी थोडक्यात लिहा.

**प्रश्न ४. थोडक्यात उत्तरे द्या. (चार पैकी दोन) गुण १०**

१. अजीम नवाज राही यांच्या कवितेतील मोहल्ला व गावाचे चित्रण तुमच्या शब्दात लिहा.

२. अजीम नवाज राही यांच्या कवितेतून प्रकटणाऱ्या कवी मनाचा वेध घ्या.

३. अजीम नवाज राही यांनी कवितेत दुष्काळाचे चित्रण कसे केले आहे?

४. जातीय दंगलीमुळे गावातील सामाजिक सलोखा कसा बिघडतो, ते ‘जातीय दंगल : १२ भानगडींची १३ वळणे’ या कवितेच्या आधारे स्पष्ट करा.

५. जातीच्या कळपवादी भूमिकेमुळे गावाचे सामाजिक वातावरण कसे संशयाचे बनते ते सुरक्षेची हमी देणारा कळपवाद या कवितेच्या आधारे स्पष्ट करा.

६. मोडतोडीतून डागडुजीची भाषा शिकताना या कवितेतून कवीचे कोणते मनोगत व्यक्त होते?

७. धर्म आणि प्राणिमात्रांबद्दलचा दया भाव आता कसा बदलत गेला आहे, ते 'मोहल्ला, पक्षी आणि कातरवेळ' या कवितेच्या आधारे स्पष्ट करा.

८. कल्पना दुधाळ यांच्या कवितेतील स्त्रीचा अस्तित्वशोध तुमच्या शब्दात स्पष्ट करा.

९. कल्पना दुधाळ यांच्या कवितेतील आईच्या मनातील कल्लोळ तुमच्या शब्दात व्यक्त करा.

१०. 'झुलत्या फांदीला गं' या कवितेतून एका अल्लड मुलीचे कोणते चित्रण आले आहे?

११. 'घोषणा' या कवितेत कवयित्रीने कोणती वेदना व्यक्त केली आहे?

१२. 'धग असतेच आसपास' या कवितेत प्रकटलेले कवयित्रीचे मन तुमच्या शब्दात उलगडून दाखवा.

१३. 'बाय आणि गाय' या कवितेतील काव्यसौंदर्य उलगडून दाखवा.

१४. 'खस्ता' या कवितेतील आईचे सूर्यनारायणाकडील मागणे, तुमच्या शब्दात लिहा.

१५. 'घोषणा' या कवितेतील सामाजिक जाणीव स्पष्ट करा.

१६. 'धग असतेच आसपास' आग आणि काडी फक्त निमित्ताला असं कल्पना दुधाळ का म्हणतात? तुमच्या शब्दात लिहा.

१७. स्त्रीची व्यथा वेदना 'बाय आणि गाय' या कवितेत दुधाळ यांनी कशी व्यक्त केली आहे ते सांगा.

१८. कवीने सांगितलेला 'सुरक्षेची हमी देणारा कळपवाद' तुमच्या शब्दात लिहा.

१९. 'जातीय दंगल : १२ भानगडींची १३ वळणे !' या कवितेची मध्यवर्ती कल्पना सांगा.

२०. कवीच्या मनाची हळहळ 'मोहल्ला, पक्षी आणि कातरवेळ' या कवितेच्या आधारे स्पष्ट करा.

**प्रश्न ५. लघुत्तरी प्रश्न (चार पैकी दोन) गुण १०**

१. काव्यलेखन करताना कोणकोणत्या घटकांना महत्त्व द्यावे.

२. काव्यनिर्मितीत भाषा, नाद, लय, प्रतिमा, प्रतीके यांचे महत्त्व काय असते ते स्पष्ट करा.

३. रस्त्यावर पाहिलेल्या अपघाताच्या प्रसंगावर कविता लिहा.

४. पहिल्या पावसात भिजल्याचा अनुभव कवितेत कसा व्यक्त करता येईल.

५. वारंवार होणाऱ्या बॉम्बस्फोटाच्या घटनेवर कविता लिहा.

६. महापुरामुळे झालेल्या स्थितीचे कवितेत चित्रण करा.

७. काव्य निर्मितीच्या प्रेरणा सांगा.

८. काव्यलेखन करताना कोणती काळजी घ्यावी.

९. पहिल्या प्रेमावर कविता लिहा.

१०. प्रेयसीबरोबर पावसात भिजण्याच्या प्रसंगावर कविता लिहा.

११. कोरोनाचा अनुभव कवितेतून मांडा.

१२. वृद्धाश्रमाला भेट दिल्यानंतर मनात आलेले विचार कवितेतून मांडा.

१३. प्रेत जळताना पाहिल्याच्या प्रसंगावर कविता लिहा.

१४. तुमच्या आवडत्या कवितेतील प्रतिमा उलगडून दाखवा.

१५. तुमच्या आवडत्या प्राण्याविषयीच्या भावना कवितेतून व्यक्त करा.